**सं.फौ.ख.क्र.५८२/२०१८**
**कल्पना ..वि.. प्रमीला**
**नि.क्र. ४० चा भाग**

**<u>आरोपी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास</u>**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव – नितीन वसंतराव लांबट**

**वय – ४१ वर्षे, व्यवसाय – नोकरी,**

**राह. बेसुर, तह. भिवापुर, जिल्हा नागपुर.**

**शपथेवर सरतपास आरोपी तर्फे श्री. धांडे वकील यांचे मार्फत.**

आमच्या शाखेमधे नागो बाळाजी कोसे यांचे खाते होते. मला साक्षीसाठी नोटीस समन्स मिळाली त्यानुसार मी बँकेद्वारे संबंधीत कागदपत्र न्यायालयात दाखल केले. मी २३/१५९८ हा जुना खाते क्रमांक आहे याची मी तपासणी केली. त्याच खात्याचा मी सीबीएस अकाउंट नं.१००२०३१३०००१५९ त्या संबंधाने मी खाते उतारा दाखल केला आहे. मी जुन्या खात्याचा पासबुक दाखल केला आहे. पासबुकची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.४१** देण्यात येते. फिर्यादी यांनी आक्षेप घेतला की, सदरच्या केसशी पासबुकचा संबंध नाही. पासबुक धारक केसमधे पक्षकार म्हणुन सामील नाही. परंतु ती मुळ प्रत असल्याने त्यास निशाणी देण्यात येते. मी नवीन सीबीएस नंबरचे पासबुक दाखल केले आहे. मी बँकेच्या रेकॉर्डनुसार ते तंतोतंत खरे असल्याची शाहानीशा केली आहे. त्यावर बॅकेचा शिक्का व माझी सही आहे. दि.२२.०८.२००२ ते ०२.०३.२०२६ पावेतोचा खाते

उतारा आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते. मी आता त्या खात्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास **आर्टीकल ब** देण्यात येते. नागो बाळा कोसे यांचा बँक खाते चालु करण्याबाबतचा अर्ज दाखल केला आहे. त्यास **आर्टीकल क** देण्यात येते. निशाणी क्र.२२ चा धनादेश हा खाते क्र.१५९८ चा आहे. सध्या हे खाते इनऑपरेटीव्ह आहे. त्याच लास्ट ट्रन्झॅक्शन २०१५ ला झाले होते. खातेदार मयत झाले काय ? हे मला माहीत नाही. हे मला माहीत नाही की, नागो बाळा कोसे दि.१३.०६.२०१५ रोजी निधन झाले होते की काय ?

**आरोपी यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत,** **माझे समक्ष,**

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : १२.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

उमरेड,

**सं.फौ.ख.क्र.५८२/२०१८**
**कल्पना ..वि.. प्रमीला**
**नि.क्र. ४० चा भाग**

**<u>अधिकचा सरतपास आरोपी यांच्यातर्फे विधीज्ञ श्री धांडे यांच्यामार्फत सुरू.</u>**

२. आता मला आर्टीकल अ दाखविण्यात आले. ते स्टेटमेंट आहे. मी अभिलेखावर भारतीय साक्षपुरावा अधिनियम ६५बी चे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४५** देण्यात येते. त्याप्रमाणे मी आर्टीकल अ हे बँकेच्या कंप्युटरवरुन काढले आहे. त्यावर माझी सही, बँकेचे सील आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. खातेउतारा हा सीस्टीम जनरेटेड आहे, तो मी स्वतः प्रमाणीत केला आहे. त्यास **नि.क्र. ४६** देण्यात येते. त्यानंतर मी अकाउंटचे स्टेटस दाखल केले आहे. आता मला आर्टीकल बी दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्या बाबतचे प्रमाणपत्र मी दिले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येते. त्यानंतर मी बचत खात्याचा खाते उघडल्याचा फार्म दाखल केला आहे. त्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. ते मी स्वतः प्रमाणीत केले आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री हुंगे यांच्या मार्फत सुरू</u>**

३. मी सन २०२२ पासून श्रीकृष्ण कॉऑपरेटीव बँकेत शाखा प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०२२ पुर्वी बॅकेचे जे ट्रान्झॅक्शन झाले असतील ते मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ६५बी चे प्रमाणपत्र नि.क्र. ४५ हे मी वकीलाच्या सल्ल्यानुसार तयार केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४५ मध्ये मी कोणाचा खातेउतारा

दाखल केला आहे, ते नमुद नाही. हे मला माहीत नाही की, ६५बी चे प्रमाणपत्र देणेपुर्वी अकाउंटंट कडून वेरीफाईड करुन घ्यावे लागते की काय. हे म्हणणे खरे नाही की, बँकेत ज्याचे खाते आहे, ते अकाउंटंट बघतात. हे म्हणणे खरे आहे की, खात्यामधुन जे काही ट्रान्झॅक्शन पास करायचे असते ते अकाउंटंटच पाहतो.

४. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे संबंधीत खात्याची माहीती त्या अकाउंटंटला असते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४५ मध्ये तो बचत खाता आहे, चालू खाता आहे, याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४१ वर कोणत्या शाखा प्रबंधकाची सही आहे, हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,** **माझे समक्ष,**

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : ०९.०४.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

उमरेड,